# मराठी न्यूज एक्सप्रेस

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा! : ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » शनिवार, दि. 12 जुलै 2025 | पान- 1


# पीएमआरडीए क्षेत्रातील नियमबाह्य गृहप्रकल्पांवर कारवाईसाठी 15 दिवसांची अंतिम मुदत

## नागरिकांच्या हक्कांसाठी कठोर पावले : पीएमआरडीएची नियमबाह्य प्रकल्पांविरोधात कारवाई

**पिंपरी | प्रतिनिधी**

PMRDA क्षेत्रातील नियमबाह्य गृहप्रकल्पांवर कारवाईसाठी अखेर १५ दिवसांची अंतिम मुदत जाहीर करण्यात आली असून, विधानसभेचे उपाध्यक्ष आण्णा बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या फेरआढावा बैठकीत संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट निर्देश देण्यात आले. मावळचे आमदार सुनील शेळके यांनी विधानसभेत उपस्थित केलेल्या प्रश्नाच्या अनुषंगाने या संपूर्ण प्रकरणाचा पाठपुरावा केला होता. नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण व्हावे, या उद्देशाने शेळके यांच्या प्रयत्नांना अखेर यश लाभले आहे.

नियम डावलून देण्यात येत आहेत पूर्णत्वाचे दाखले...

PMRDA कडून काही मोठ्या गृहप्रकल्पांना कोणतीही शहानिशा न करता, नियमनाचे उल्लंघन करत पूर्णत्वाचे दाखले दिले जात असल्याच्या तक्रारी आमदार सुनील शेळके यांनी विधानसभेत मांडल्या होत्या. त्यावरून १९ जून २०२५ रोजी झालेल्या बैठकीत संबंधित प्रकल्पांची यादी, कारवाईचा तपशील व विकासकांविरोधातील लेखी तक्रारी याबाबत आठ दिवसांत सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले होते.

दूषित पाणी व सांडपाण्यामुळे नागरिक त्रस्त...



आज झालेल्या बैठकीत सादर करण्यात आलेल्या अहवालात मावळ तालुक्यातील काही प्रकल्पांमधून दूषित व पिण्यायोग्य नसलेले पाणी पुरवले जात असल्याचे स्पष्ट झाले. अनेक प्रकल्पांमधून सांडपाण्यावर प्रक्रिया न करता ते थेट पवना आणि इंद्रायणी नद्यांमध्ये सोडले जात असल्याने पर्यावरणाची मोठी हानी होत आहे. अपुऱ्या नागरी सुविधांमुळे रहिवासी त्रस्त आहेत, तर विकासकांचा मनमानी कारभार सुरू असल्याच्या तक्रारीही वाढत आहेत.

### 15 दिवसांत कठोर कारवाईचे आदेश..

» विधानसभेचे उपाध्यक्ष आण्णा बनसोडे यांनी या पार्श्वभूमीवर अधिकाऱ्यांना पुढील १५ दिवसांत ठोस कारवाई करण्याचे आदेश दिले. "नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित मुद्द्यांवर कोणतीही तडजोड स्वीकारली जाणार नाही," असे ते म्हणाले.

या फेरआढावा बैठकीस संबंधित वरिष्ठ अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यामध्ये डॉ. योगेश म्हसे (महानगर आयुक्त, पीएमआरडीए), शेखर सिंह – (आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका) सुरेंद्र नवले (उपविभागीय अधिकारी, मावळ), विक्रम देशमुख (तहसीलदार, मावळ) आदींचा समावेश होता.

या निर्णयामुळे मावळ, मुळशी आणि PMRDA क्षेत्रातील नागरिकांना सुरक्षित पाणी, योग्य सुविधा, पर्यावरण रक्षण आणि कायदेशीर आधार मिळण्याची आशा निर्माण झाली आहे. आमदार सुनील शेळके यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा विषय निर्णायक वळणावर पोहोचल्याचे पाहायला मिळत आहे.

---

# कुदळवाडीतील राडारोड्यामुळे आरोग्य समस्यांत वाढ

**पिंपरी | प्रतिनिधी**

मागील पाच महिन्यांपूर्वी म्हणजेच फेब्रुवारी महिन्यात कुदळवाडीतील अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्यात आली. मात्र राडारोड्याकडे महापालिका प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचे चित्र पहायला मिळत आहे. परिणामी राडारोड्यामुळे पावसाळ्यातील आजारांना आमंत्रण मिळाले आहे. डासांची वाढती पैदास, धूळ, जलप्रदूषण या सर्वांचा परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत असून, तत्काळ राडारोडा उचलण्यासाठी महापालिकेने उपाययोजना राबवाव्यात अशी मागणी करण्यात येत आहे.

फेब्रुवारी महिन्यात कुदळवाडीत मोठी अतिक्रमण कारवाई झाली. शहरातील मोठ्या प्रमाणातील स्क्रॅप व्यावसायिक या परिसरात होते. कारवाई झाल्यानंतर सर्व राडारोडा जागीच अस्ताव्यस्त पडलेला आहे. कारवाईनंतर राडारोडा उचलण्यासाठी महापालिकेने जागा मालकांशी चर्चा करून नियोजन



करणे अपेक्षित होते. मात्र अद्यापही राडारोडा जैसे थे असल्याने पावसाळ्यात डासांची पैदास, जलप्रदूषण यामुळे नागरिकांच्या आरोग्य समस्या वाढल्या आहेत.

> "महापालिकेने अतिक्रमण कारवाई केली. त्यानुसार राडारोडा उचलण्यासाठीही पुढाकार घ्यावा. ज्यामुळे नागरिकांना आरोग्याच्या समस्या येणार नाहीत. राडारोड्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होतो, विशेषतः लहान मुले आणि वृद्ध व्यक्तींना याचा जास्त त्रास होतो. राडारोडा साचल्यामुळे पावसाळ्यात पाणी साचून चिखल होतो, ज्यामुळे डासांची पैदास वाढते. त्यातून आरोग्याच्या समस्या वाढल्या जातात.
>
> **- अश्विनी जाधव, माजी नगरसेविका.**

> "पोटाचे विकार, कॉलरा , दुषित पाण्यामुळे विविध आजारांचे रूग्ण वाढले आहेत. तसेच राडारोड्यामुळे डासांची पैदास वाढून आरोग्य समस्या वाढत आहेत. त्यामुळे महापालिकेने पुढाकार घेऊन राडारोडा उचलावा. त्यामुळे परिसरातील बकालपणा जाण्यास मदत होईल. जागामालकांनाही सहकार्य होईल.
>
> **- दिनेश यादव, मा. स्विकृत नगरसेवक.**

# देहूरोड कॅन्टोन्मेंटचा समावेश महापालिकेत नाही

## तत्कालीन आयुक्तांच्या समितीने शासनास प्रतिकूल अहवाल पाठविला

**पिंपरी | प्रतिनिधी**

देहूरोडच्या काही भागाचा २७ वर्षांपूर्वी महापालिकेत समावेश होऊनही विकास झाला नाही, त्यामुळे तत्कालीन आयुक्तांच्या समितीने शासनास प्रतिकूल अहवाल पाठविला. या कारणामुळेच राज्य शासनाने गुरुवारी (दि. १० जुलै) देहूरोड कॅन्टोन्मेंटचा समावेश पिंपरी-चिंचवड महापालिकेत केला नाही. खडकी-पुणे कॅन्टोन्मेंटच्या पुणे महापालिकेतील समावेशामुळे याबाबत पुन्हा चर्चा सुरू झाली आहे. महापालिकेत समावेश किंवा स्वतंत्र नगरपालिका याबाबत उलटसुलट प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत.



इंग्रजांच्या कालखंडात १९४० मध्ये देहूगावजवळ आणि पुणे-मुंबई राष्ट्रीय महामार्ग आणि लोहमार्ग दरम्यानच्या देहूरोड रस्त्यावर लष्करी तळ वसविण्यात आले. येथे दारूगोळा आणि शस्त्रास्त्र निर्मिती कारखाना सुरू झाला. त्यानंतर देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाची स्थापना ६ ऑक्टोबर १९५८ रोजी झाली. लष्करी तळाशेजारील भागाचा विकास करण्यास सुरुवात झाली. हे 'ब' वर्ग कॅन्टोन्मेंट बोर्ड आहे. पुण्यापासून २५ आणि मुंबईपासून १५० किलोमीटर अंतरावर देहूरोड शहर आहे. या भागाचे एकूण क्षेत्रफळ ९ हजार ९०० एकर आहे, तर २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या ४८ हजार ९६३ होती. येथे निवडणुकीसाठी सात प्रभाग आहेत. त्यात देहूरोडच्या सर्व लष्करी भागासह शेलारवाडी, कोटेश्वरवाडी, इंद्रायणी दर्शन, मामुर्डी, शितळानगर, थॉमस कॉलनी, संत तुकारामनगर, देहूरोड बाजारपेठ, शिवाजीनगर, गांधीनगर, आंबेडकरनगर, दत्तनगर (निगडी), सिद्धिविनायकनगरी (निगडी), आयुध निर्माणी वसाहत, चिंचोली, किन्हई, झेंडेमळा, जाधव मळा, काळोखे मळा, हगवणे मळा या नागरी भागाचा समावेश होतो. आता लोकसंख्या दोन लाखांवर पोहोचली आहे.

### त्रिसदस्यीय समितीच्या माध्यमातून कारभार

देहूरोड कॅन्टोन्मेंटची शेवटची निवडणूक मे २०१५ रोजी झाली होती. त्याची मुदत मे २०२० रोजी संपली. त्यानंतर एक वर्षाची मुदतवाढ मिळाली. त्यानंतर २०२१ पासून प्रशासकीय समिती कार्यरत आहे. आता त्रिसदस्यीय समितीच्या माध्यमातून कारभार सुरू आहे.

# स्वारगेट-कात्रज मेट्रो मार्गाला गती

## ‘महामेट्रोने राबविलेल्या निविदा प्रक्रियेच्या मुदतीपर्यंत सहा कंपन्यांनी प्रतिसाद दिला

**पुणे | प्रतिनिधी**

महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनच्या (महामेट्रो) विस्तारित स्वारगेट ते कात्रज मार्गिकेच्या निविदा प्रक्रियेला सहा कंपन्यांनी प्रतिसाद दिला आहे. तांत्रिक आणि आर्थिक पडताळणीच्या निकषानुसार कंपनीची नियुक्ती करण्यात येणार आहे. या प्रक्रियेला साधारणतः दोन ते अडीच महिन्यांचा कालावधी लागणार असून, पुणेकरांच्या दृष्टीने मेट्रोचे आणखी एक पाऊल पुढे पडले आहे.




‘महामेट्रोने राबविलेल्या निविदा प्रक्रियेच्या मुदतीपर्यंत सहा कंपन्यांनी प्रतिसाद दिला. आता निविदा समिती या कंपन्यांची तांत्रिक-आर्थिकदृष्ट्या पडताळणी करून निकषात बसणाऱ्या कंपनीची नियुक्ती करील. त्यानंतर वित्तीय प्रक्रिया पूर्ण करून अखेरची प्रक्रिया अंतिम करण्यात येईल. या प्रक्रियेसाठी साधारणतः अडीच ते तीन महिन्यांचा कालावधी लागेल,’ अशी माहिती ‘महामेट्रो’चे कार्यकारी संचालक हेमंत सोनवणे यांनी दिली.

### काय होणार फायदा ?

स्वारगेट ते कात्रज हा रस्ते मार्ग अत्यंत वर्दळीचा असून, उड्डाणपूल असताना या मार्गावर नियमित गर्दी असते. या मार्गावर बिबवेवाडी, धनकवडी, पद्मावती, बालाजीनगर, हा दाट लोकवस्तीचा भाग असल्याने रस्त्यावर वाहतूक कोंडी, अपघात, प्रदूषण अशा अनेक समस्या आहेत. या प्रकल्पामुळे उंड्री, पिसोळी, धनकवडी, बालाजीनगर, बिबवेवाडी परिसरातील स्थानिकांना प्रवास सुकर होणार आहे. विशेषतः शहराच्या हरित आणि शाश्वत विकासासाठी हा महत्त्वाचा टप्पा महत्वाचा मानला जात आहे.

### विस्तारित प्रकल्पाचा आढावा

» विस्तार – स्वारगेट ते कात्रज भुयारी मार्ग
अंतर – ५.४६ किलोमीटर

» खर्च – अंदाजे ३,६३७ कोटी
स्थानके – स्वारगेट, मार्केट यार्ड, सहकारनगर (बिबवेवाडी), पद्मावती आणि कात्रज

# पुणे-नाशिक रेल्वेचा ‘डीपीआर’ पूर्ण

## कागदोपत्री त्रुटींची छाननी करून हा अहवाल आठवडाभरात रेल्वे मंत्रालयाकडे पाठविण्यात येणार

**पुणे | प्रतिनिधी**

मध्य रेल्वेने नवीन ‘पुणे-अहिल्यानगर-शिर्डी-नाशिक’ या ‘सेमी हायस्पीड’ मार्गासंबंधी सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) पूर्ण केला आहे. केंद्रीय रेल्वे मंत्र्यांने याबाबत आदेश दिला होता. कागदोपत्री त्रुटींची छाननी करून हा अहवाल आठवडाभरात रेल्वे मंत्रालयाकडे पाठविण्यात येणार आहे. पुणे-नाशिक द्रुतगती प्रकल्प जुन्या मार्गानुसार करावा, अशी स्थानिक नागरिक आणि काही लोकप्रतिनिधींची भूमिका असताना डीपीआरचे काम पूर्ण करण्यात आले आहे.




खोडद (ता.जुन्नर) येथील ‘जायंट मीटरव्हेव रेडिओ टेलिस्कोप’ (जीएमआरटी) हा जागतिक दुर्बिण संशोधन प्रकल्प रेल्वेमार्गाला अडथळा ठरत आहे, म्हणून रेल्वेमंत्री आश्विनी वैष्णव यांनी ‘पुणे-अहिल्यानगर-शिर्डी-नाशिक’ या नवीन रेल्वे मार्गाबाबत सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्याचे आदेश जानेवारी महिन्यात रेल्वे प्रशासनाला दिले होते. त्यानुसार मध्य रेल्वे विभागातील अभियंत्यांकडून सर्वेक्षणाचे काम पूर्ण करून ‘डीपीआर’चे काम पूर्ण केले आहे.

### कसा आहे नवीन अहवाल ?

नवीन ‘डीपीआर’नुसार पुणे-अहिल्यानगर रेल्वे मार्ग सध्याच्या महामार्गाला समांतर असणार आहे, तर शिर्डी ते नाशिक यासाठी नवीन मार्ग निश्चित केला जाणार आहे. त्यानुसार पुणे-नाशिक रेल्वे मार्गिकेचे अंतर २३५ किलोमीटर असून, पुणे ते अहिल्यानगर १२५ किमी, तर शिर्डी ते नाशिकमधील अंतर सुमारे ८२ किमी आहे. नव्या मार्गामुळे पुणे-नाशिक या दोन शहरांमधील प्रवासाच्या अंतरात पाऊण तास वाढ होण्याची शक्यता असली, तरी या मार्गात कोणताही अडसर नसल्याचे रेल्वेतील अधिकाऱ्यांनी सांगितले.

### प्रकल्पाचा आढावा

» एकूण अंतर – सुमारे २३५ किलोमीटर
» एकूण खर्च – सुमारे १६ हजार कोटी
» गती क्षमता – प्रति तास २०० किलोमीटर
» प्रकल्पाचा कालावधी – साडेतीन वर्षे
» एकूण स्थानके – २४ (१३ मोठी, ११ लघु)

“ पुणे-अहिल्यानगर-शिर्डी-नाशिक या प्रस्तावित ‘सेमी हायप्स्पीड’ प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल पूर्ण झाला आहे. कागदोपत्री त्रुटी दूर करण्यात येत असून, दुरुस्तीअंती वरिष्ठांकडे हस्तांतरित करण्यात येईल. साधारणत: आठवडाभरात हा अहवाल रेल्वे मंत्रालयाकडे पाठविण्यात येईल.

**- मोहित सिंग, उपमुख्य अभियंता, मध्ये रेल्वे, पुणे विभाग.**

“ ‘जुन्नर येथील ‘जीएमआरटी’ प्रकल्पाला धक्का न लावता किंवा अडचण निर्माण होऊ न देता उंचावरून किंवा बोगद्यातून रेल्वे मार्गिका पुढे घेऊन जाणे शक्य आहे. जुन्या प्रकल्पानुसार नाशिक, सिन्नर, शिर्डी भागातील अनेक बाधित शेतकऱ्यांच्या जमिनींचे संपादन झाले आहे. औद्योगिक आणि भौगोलिकदृष्ट्या नोकरदारांबरोबर शेतमालाच्या दृष्टीने हा मार्ग महत्त्वाचा आहे.

**- डॉ. अमोल कोल्हे, खासदार**

# आता वर्दळीच्या भागात महापालिकेचे स्मार्ट पार्किंग

## 'पार्किंग पाल'च्या माध्यमातून शहरातील दहा ठिकाणी उपलब्ध करून देणार सुविधा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटी व महापालिकेच्या अंतर्गत पार्किंग पाल या स्टार्टअपच्या माध्यमातून वर्दळीच्या भागात दहा ठिकाणावर पार्किंग स्थळ सुरु करण्याचा प्रभावी अंमलबजावणी सुरु केली.

महापालिकेकडून प्रायोगिक तत्त्वावर सुरू केलेली 'पे अँड पार्क' योजना कायमस्वरूपी राबवण्यात येत आहे. त्यानूसार निगडी, चिंचवड आणि नाशिक फाटा या तीन जागेवर पार्किंग धोरण सुरु केले आहे. याकरिता स्मार्ट सिटी आणि महापालिकेकडून 'पार्किंग पाल'च्या स्टार्टअप एजन्सीला थेट पध्दतीने काम देण्यात आले आहे. शहराच्या लोकसंख्येबरोबर वाहनांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. सद्य:स्थितीत शहराची लोकसंख्या ३० लाखांच्या जवळपास आहे. गेल्या तीन वर्षांत पावणेचार लाख वाहनांची भर पडली आहे. त्यामुळे वाहतुकीची मोठी समस्या निर्माण होत आहे. महापालिका प्रशासनाने वाहतूक नियंत्रण, इंधन बचत, सार्वजनिक वाहतुकीचा सुयोग्य वापर आणि त्यामुळे होणारे वैयक्तिक फायदे यांसाठी पे ॲण्ड पार्क धोरण राबविण्यास सुरुवात केली आहे.

महापालिका शहरी दळण-वळण विभागाकडून शहरासाठी वाहतूक धोरण तयार करण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून शहरात काही ठिकाणी 'पे अँड पार्क' योजना प्रायोगिक तत्त्वावर राबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. शहर आणि परिसरात नागरिकरण वेगाने वाढत आहे. वाढत्या नागरिकरणामुळे शहराच्या वर्दळीत झपाट्याने वाढ होत आहे. वाहने अनधिकृतरीत्या आणि वाहतुकीस अडथळा निर्माण होईल या पद्धतीने उभी केली जात आहेत. त्यामुळे दिवसेंदिवस वाहतूक समस्या जटील होऊ लागली आहे. त्यावर उपाययोजना राबविणे क्रमप्राप्त होते. त्यानूसार शहरात सुरुवातीस दहा ठिकाणी पार्किंग नियोजनाचा प्रारंभ करण्यात आला आहे.



### नागरिकांना मिळेल अचूक माहिती..

» 'पार्किंग पाल'च्या माध्यमातून नागरिक व्हाट्सअपवरून जवळच्या पार्किंगची माहिती मिळवू शकतील, जागेचे आरक्षण करू शकतील आणि पार्किंगची अचूक माहितीही पूर्वनियोजितपणे मिळवू शकतील. ही पद्धत केवळ सोयीचीच नव्हे, तर शाश्वत विकासाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. या उपक्रमात व्हाट्सअप, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) व ब्लॉकचेन सारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून नागरिकांना जवळपासच्या उपलब्ध पार्किंग जागा शोधणे सुलभ होणार आहे. ही योजना महाराष्ट्र राज्य शासनाच्या ई-गव्हर्नन्स अंतर्गत मुख्यमंत्री १५० दिवस कार्यक्रमात समाविष्ट करण्यात आलेली आहे.

### इथे सुरु होणार स्मार्ट पार्किंग

» पिंपरी-चिंचवड महापालिका व स्मार्ट सिटी अंतर्गत शहरातील दहा ठिकाणी स्मार्ट पार्किंगमध्ये 'पे ॲण्ड पार्क' सुरु करण्यात येणार आहे. हे काम 'पार्किंग पाल' या स्टार्टअप एजन्सीला देण्यात आले आहे. त्यानूसार चिंचवड गावातील चापेकर चौक, निगडीतील उड्डाणपूल, रामकृष्ण मोरे आणि अकुंशराव लांडगे प्रेक्षागृह, स्पॉट-१८ मॉल, भक्ती-शक्ती उड्डाणपूल अशा दहा ठिकाणी प्रायोगिक तत्त्वावर 'पे ॲण्ड पार्क' सुरू करण्यात येणार आहे. शहरातील पार्किंग समस्येवर उपाय म्हणून अत्याधुनिक पार्किंग योजनेचा शुभारंभ महापालिकेच्या सभागृहामध्ये करण्यात आला. शहरातील नागरिकांना वर्दळीच्या भागात पार्किंगसाठी सुसूत्र व्यवस्था मिळणार असून सार्वजनिक वाहतूक व्यवस्थाही अधिक सक्षम होणार आहे. आयुक्त शेखर सिंह यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीमध्ये पार्किंग व्यवस्थेची अंमलबजावणी करण्यात आली.

> "महापालिकेच्या शहरी दळणवळण विभागामार्फत या योजनेची अंमलबजावणी केली आहे. भविष्यात शहरातील इतर प्रमुख ठिकाणीही ही सुविधा विस्तारली जाणार आहे. नागरिकांचा वेळ व इंधन वाचवण्यासाठी आणि शिस्तबद्ध पार्किंग संस्कृती विकसित करण्यासाठी ही योजना उपयुक्त ठरणार आहे.
>
> **- अभिमान भोसले, कार्यकारी अभियंता, महापालिका**

# पिंपरी चिंचवड शहरातील अनधिकृत बांधकामे, अतिक्रमणांवर कारवाई करा: शेखर सिंह

## कारवाईमध्ये सातत्य ठेवा अन्यथा निलंबनाची कारवाई केली जाईल, असे आदेश महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील अनधिकृत बांधकामांची संख्या वाढली आहे. त्यावर तातडीने कारवाई करा. पदपथावर अतिक्रमण होणार नाही, यासाठी पथकांची नियुक्ती करा. कारवाईमध्ये सातत्य ठेवा. अन्यथा निलंबनाची कारवाई केली जाईल, असे आदेश महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत.

शहरातील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणविरोधी मोहिमेचा आढावा आयुक्तांनी घेतला. बैठकीस अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, सहआयुक्त मनोज लोणकर, उपायुक्त राजेश आगळे, सहाय्यक आयुक्त किरणकुमार मोरे, अमित पंडित, अतुल पाटील, निवेदिता घार्गे, प्रशासन अधिकारी किशोर ननवरे, कार्यकारी अधिकारी लक्ष्मीकांत कोल्हे, विजय सोनवणे, प्रभारी कार्यकारी अभियंता सूर्यकांत मोहिते, उपअभियंता किरण माने आदी उपस्थित होते.

आयुक्त सिंह म्हणाले की, सध्या शहरात सुरू असलेल्या सर्व प्रकारच्या अनधिकृत बांधकामांवर तात्काळ कारवाई करण्यात यावी. नियमातील तरतुदीनुसार अशा बांधकामांवर कारवाई करण्यापूर्वी 24 तास अगोदर नोटीस द्या. शहरातील रस्त्यालगतच्या पदपथावर होणारे अतिक्रमण काढण्यात यावे. सर्व क्षेत्रीय अधिकारी व बीट निरीक्षकांनी सतर्क राहावे. कारवाईमध्ये टाळाटाळ करणारे अधिकारी, कर्मचारी यांच्यावर तात्काळ निलंबनाची कारवाई केली जाईल.

शहरातील कोणत्या प्रभागात अतिक्रमण, अनाधिकृत बांधकामाची समस्या जास्त आहे, ही समस्या सोडवण्यासाठी कशा प्रकारे उपाययोजना सुरू आहेत, यावर चर्चा करण्यात आली. अनधिकृत बांधकामे, पदपथ व नाल्यावर झालेले अतिक्रमण, परवानगीविना सुरू असलेल्या आठवडे बाजार याचाही आढावा बैठकीत घेण्यात आला.

अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी सांगितले की, अनाधिकृत बांधकामावर कारवाई करण्यासोबतच अशा प्रकारची बांधकामे होणार नाहीत, यासाठी विशेष काळजी घ्यावी. अतिक्रमण, अनधिकृत बांधकामाची समस्या सोडवण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायांवर भर देण्यासोबतच फिल्डवर असणाऱ्या अधिकाऱ्यांनी सातत्याने निरीक्षण करून तात्काळ पावले उचलावीत.




### भंगार दुकाने, पूररेषेतील बांधकामांकडे दुर्लक्ष

» कुदळवाडी येथील भंगार दुकाने व गोदामांवर सात दिवस धडक कारवाई करण्यात आली. त्यानंतर शहरातील सर्व भागांतील अनधिकृत भंगार दुकाने व गोदामांवर कारवाई करणार, असे आयुक्त शेखर सिंह यांनी जाहीर केले होते. तसेच, न्यायालयाच्या आदेशानुसार निळ्या पूररेषेतील अनधिकृत बांधकामे व पत्राशेडवर कारवाईची सर्वेक्षण करण्यात आले. मात्र, भंगार दुकाने व पूररेषेतील बांधकामांवर महापालिकेने कारवाई केलेली नाही.

# ब्रिज कोर्समुळे डॉक्टरांची प्रतिमा मलिन होईल

## बारामती येथील सभेत निषेध : आयएमएच्या कार्यकारिणीकडून संताप

**पुणे | प्रतिनिधी**

राज्य शासनाने होमिओपॅथी डॉक्टरांबाबत घेतलेला निर्णय चुकीचा, धोकादायक व जनतेच्या आरोग्याशी थेट खेळ करणारा असल्याचा आरोप इंडियन मेडिकल असोसिएशनच्या बारामती शाखेने केला आहे. दरम्यान, आपत्कालीन परिस्थितीत चुकीचे औषधोपचार, चूक निदान, सर्जिकल अज्ञान यामुळे रुग्णाच्या जीवाला धोका होऊ शकतो. यामुळे मान्यताप्राप्त एमबीबीएस डॉक्टरांची प्रतिमा मलिन होऊ शकते, असा संतप्त सूर उमटला.

राज्य शासनाने होमिओपॅथी डॉक्टरांबाबत घेतलेल्या निर्णयाविरोधात बारामती आयएमएच्या कार्यकारिणीची सभा झाली. यावेळी शासनाच्या होमिओपॅथी डॉक्टरांच्या संबंधीत निर्णयाविरोधात निषेध व्यक्त केला. भविष्यात समस्या आणि भविष्यावर उद्भवणाऱ्या धोक्यावर चर्चा केली.

बीएचएमएस डॉक्टरांचे शिक्षण हे पूर्णतः होमिओपॅथीवर आधारित असते. त्यांना आधुनिक औषधे, सर्जरी, आपत्कालीन वैद्यकीय व्यवस्थापनाचे शास्त्रशुद्ध शिक्षण मिळत नाही. १ वर्षाच्या ब्रिज कोर्समध्ये अत्यल्प प्रमाणात फार्माकॉलॉजी, मेडिसीन यांचे प्राथमिक ज्ञान दिले जाते. हा कोर्स कोणत्याही प्रकारे एमबीबीएस सरासरीच्या ५.५ वर्षांच्या अभ्यासक्रमास तुल्य नाही.

यावेळी राज्य संघटनेच्या निर्णयानुसार बारामतीतील अत्यावश्यक सोडून सर्व वैद्यकीय सेवा बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. उच्च न्यायालयात याचिका असतानाही हा निर्णय घेतलाच कसा, असा सवाल इंडियन मेडिकल असोसिएशनने केला आहे. या निर्णयाविरुद्ध राज्यासह बारामतीत आंदोलन करणार असल्याचे जाहीर केले आहे.

यावेळी बारामती शाखा अध्यक्ष डॉ. संतोष घालमे, सचिव अमोल भंडारे व खजिनदार डॉ. सौरभ निंबाळकर यांनी सांगितले. यावेळी कार्यकारिणीतील डॉ. अशोक तांबे, डॉ. संजय पुरंदरे, डॉ. महेंद्र दोशी, डॉ. विक्रांत धोपाडे, डॉ. दिनेश ओस्वाल, डॉ. सौरभ मुथा, डॉ. विभावरी सोळुंके, डॉ. स्नेहलता पवार, डॉ. रेवती संत, डॉ. प्राजक्ता पुरंदरे, डॉ. दिपीका कोकणे, डॉ. शुभांगी वाघमोडे आदी उपस्थित होते.



### ब्रिज कोर्सचे रुग्णांसाठी धोके

होमिओपॅथी व अॅलोपॅथी डॉक्टरांची कुठेही तुलना होऊ शकत नाही. एमबीबीएस प्रशिक्षित डॉक्टर संपूर्णपणे सायंटिफिक व पुराव्याधारित शिकतात. बीएचएमएस डॉक्टरांचे शिक्षण हे पूर्णतः होमिओपॅथीवर आधारित असते. त्यांना आधुनिक औषधे, सर्जरी, आपत्कालीन वैद्यकीय व्यवस्थापनाचे शास्त्रशुद्ध शिक्षण मिळत नाही. १ वर्षाच्या ब्रिज कोर्समध्ये अत्यल्प प्रमाणात फार्माकॉलॉजी, मेडिसीन यांचे प्राथमिक ज्ञान दिले जाते. हा कोर्स कोणत्याही प्रकारे एमबीबीएस सरासरीच्या ५.५ वर्षांच्या अभ्यासक्रमास तुल्य नाही. अशा डॉक्टरांना 'मॉडर्न मेडिसिन प्रॅक्टिशनर' म्हणून मान्यता दिली तर सामान्य रुग्ण गोंधळात पडतील. हा निर्णय रुग्णांसाठी धोकादायक आहे.

### न्यायप्रविष्ठ प्रकरण असूनही निर्णय

फार्माकॉलॉजी या विषयात एक वर्षाचा ब्रिज कोर्स करणाऱ्या होमिओपॅथी डॉक्टरांची नोंदणी महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलच्या स्वतंत्र रजिस्टरमध्ये करणार आहेत. (दि.१५) पासून ही नोंदणी सुरू होईल. ती पूर्ण केल्यानंतर होमिओपॅथी डॉक्टर्स अॅलोपॅथीची औषधे लिहून देऊ शकतील. त्यांना कौंसिलची मान्यता आहे. फेब्रुवारी महिन्यात आयएमएने महाराष्ट्र शासनाच्या संभाव्य निर्णयाविरोधात उच्च न्यायालयात याचिका सादर केली होती. ती न्यायप्रविष्ट असून अंतिम निर्णय झालेला नसतानाही शासनाने १५ जुलैपासून होमिओपॅथी डॉक्टरांचा महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलच्या यादीत समावेश करण्याचा निर्णय जाहीर केला आहे.

# शिरूर गुणवत्तेत अग्रणी राहण्यास कटिबद्ध : नंदकुमार सागर

## शिरूर तालुका माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाची कार्यकारिणी निवड सहविचार सभा पार पडली. त्यावेळी ते बोलत होते

**पुणे | प्रतिनिधी**

शिरूर तालुका शिक्षण व प्रशासनात राज्यात सदैव अग्रणी राहिला आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोग व भारतीय लोकसेवा आयोगातील स्पर्धा परीक्षेत यशस्वी अधिकारी तालुक्यात आहेत. पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षा, एनएमएमएस तसेच सारथी शिष्यवृत्ती परीक्षेतेही तालुक्यात शैक्षणिक परंपरा नावलौकीकास पात्र आहे. गुणवत्ता, प्रशासन व विद्यार्थी प्रगती यासाठी शिरूर तालुक्यातील कामासाठी सदैव कटिबद्ध राहील, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक महामंडळाचे सचिव नंदकुमार सागर यांनी केले.

कोंढापूरी (ता. शिरूर) येथील विद्यानिकेतन प्रशालेत शिरूर तालुका माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाची कार्यकारिणी निवड सहविचार सभा पार पडली. त्यावेळी ते बोलत होते.

सहविचार सभेस राज्य मुख्याध्यापक महामंडळाचे सचिव नंदकुमार सागर, जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष प्रसाद गायकवाड, कार्याध्यक्ष राजेश गायकवाड, डॉ. पानसरे सनी मेदगे, मुख्याध्यापक माळशिखरे, राष्ट्रपती पारितोषिक विजेते कुंडलिक मेमाणे, शिरूर तालुका मुख्याध्यापक संघाचे माजी अध्यक्ष तुकाराम बेनके, माजी सचिव मारुती कदम, राज्य मुख्याध्यापक आश्रमशाळा महामंडळाचे उपाध्यक्ष तुकाराम शिरसाट, मुख्याध्यापक उपस्थित होते.

यावेळी शिरूर तालुका मुख्याध्यापक संघाच्या निवडणुकीसाठी निरीक्षक म्हणून जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष प्रसाद गायकवाड व सचिव राजेश गायकवाड यांनी निरीक्षक म्हणून कामकाज पाहिले. राज्य मुख्याध्यापक महामंडळाचे सचिव नंदकुमार सागर यांनी नवनिर्वाचित कार्यकारिणीचे अभिनंदन केले. तुकाराम बेनके यांनी प्रास्ताविक तर रामनाथ इथापे यांनी सूत्रसंचालन केले. प्राचार्य तुकाराम शिरसाट यांनी आभार मानले.



### तालुक्याच्या गुणवत्तेस प्राधान्य देणार

» प्राचार्य रामदास थिटे म्हणाले की, विना अनुदान शाळांना त्वरित अनुदान टप्पा वितरीत करावा, १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त शिक्षक- शिक्षकेतर कर्मचारी यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, शिक्षकांची भरती वर्षातून २ वेळा पोर्टलव्दारे करावी, १५ मार्च २०२४ चा संचमान्यता शासननिर्णय रद्द करावा, शिष्यवृत्ती परीक्षा तसेच उच्च माध्यमिक विविध प्रवेश परीक्षांबाबत तालुका स्तरावर कार्यशाळांचे आयोजन, याबाबत सर्व तालुका पदाधिकारी यांचे सहकार्य घेत एकत्रित कामकाज करत तालुक्याच्या गुणवत्तेस प्राधान्य देणार आहेत.